PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Bala Gau Kashi Angai
Year: 1977

Song: Halake Halake Jojawa
Lyricist: Jagdish Khebudkar

हलके हलके जोजवा
हलके हलके जोजवा
बाळाचा पाळणा
पाळण्याच्या मधोमध
फिरतो खेळणा
हो...
हलके हलके जोजवा
बाळाचा पाळणा
पाळण्याच्या मधोमध
फिरतो खेळणा
हो...
हलके हलके जोजवा
जोजवा जोजवा

सजली गं मऊ मऊ
मखमालीची शैय्या
सजली गं मऊ मऊ
मखमालीची शैय्या
निजली गं बाळाची
गोरी गोरी काया
निजली गं बाळाची
गोरी गोरी काया
बाळ रूपडे देवाचे
भुलविते लोचना

पाळण्याच्या मधोमध
फिरतो खेळणा
हो...
हलके हलके जोजवा
बाळाचा पाळणा
पाळण्याच्या मधोमध
फिरतो खेळणा
हो...
हलके हलके जोजवा
जोजवा जोजवा

खेळवा लाडानं
गोपा बायांनो
खेळवा लाडानं
गोपा बायांनो
गोविंद घ्या गोपाळ घ्या
म्हणा सयांनो
गोविंद घ्या कुणी गोपाळ घ्या
म्हणा सयांनो
नाव ठेवा नवसाचं
हा राजा देखणा

पाळण्याच्या मधोमध
फिरतो खेळणा
हो...
हलके हलके जोजवा
बाळाचा पाळणा
पाळण्याच्या मधोमध
फिरतो खेळणा
हलके हलके जोजवा
जोजवा जोजवा

कुर्र करा कानात

PlanetRead

Literacy for a Billion

हळूच भेटा गं
कुर्र करा कानात
हळूच भेटा गं
बारशाचा सोहळा
घुगऱ्या वाटा गं
बारशाचा सोहळा
घुगऱ्या वाटा गं
ळो आज बाई इंद्राचा
दरबार ठेंगणा

पाळण्याच्या मधोमध
फिरतो खेळणा
हलके हलके जोजवा
हलके हलके जोजवा
बाळाचा पाळणा
पाळण्याच्या मधोमध
फिरतो खेळणा
हलके हलके जोजवा
जोजवा जोजवा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*